महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

फोन क्र : (०२०) २६१२७९०६ Website: https://mahaprisons.gov.in

# महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा वार्तापत्र

माहे- मार्च -२०२६

**शुभेच्छा संदेश**

## संपादकीय संदेश



**श्री.सुहास वारके**
**महासंचालक**
**कारागृहे व सुधार सेवा,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रिय सर्व अधिकारी व कर्मचारी,

महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विभागातील सर्व महिला अधिकारी, कर्मचारी व महिला बंदी भगिनींना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

आपल्या कर्तव्यनिष्ठ, संवेदनशीलता, धैर्य आणि समर्पणामुळे कारागृह प्रशासन अधिक सक्षम, सुरक्षित व मानवतावादी बनत आहे. समाज घडविण्यात महिलांचे योगदान अमूल्य असून, आपल्या कार्यामुळे सुधारणा व पुनर्वसन प्रक्रियेला नवी दिशा मिळत आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण, समानता आणि आत्मविश्वासाचा संदेश अधिक दृढ करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे कार्य करत राहूया. आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे आयोजित “De-Radicalization of Prisoners Course”**

## महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे आयोजित “De-Radicalization of Prisoners Course” हा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम भारतातील सर्व राज्यांपैकी महाराष्ट्रात प्रथमच आयोजित करण्यात आला, ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे. या अत्यंत महत्त्वपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विविध मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

सर्वप्रथम Dr. Upneet Lalli (ICA Chandigarh) यांनी कोर्सचे उद्दिष्ट, नियम आणि कारागृहातील कैद्यांच्या Radicalization व De-Radicalization प्रक्रियेचे सखोल मार्गदर्शन करून या प्रशिक्षणाची भक्कम पायाभरणी केली.

Mr. Padmakar / Padulkar (Redd. DGP, Emeritus Director, MIA) यांनी उद्घाटन सत्रामध्ये कारागृह व्यवस्थापन आणि सुरक्षेचे व्यापक दृष्टिकोन स्पष्ट केले.


Mr. Arun Naik (Psychologist, Pune) यांनी Radicalization चा मानसशास्त्रीय दृष्टिकोन, त्यामागील कारणे आणि त्यावर उपाययोजना याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

Dr. K. P. Singh (Former DG Prisons, Haryana) यांनी भारतातील दहशतवादाशी संबंधित कायदेशीर चौकट आणि त्यावरील कारवाईची प्रक्रिया याबाबत ऑनलाईन सत्रातून महत्त्वपूर्ण माहिती दिली.

**Maharashtra Intelligence Academy, Pune**

**De-Radicalization of Prisoners**

**Training Programma - 2026 Date, 09 March 2026 to 11 March 2026**



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे आयोजित "De-Radicalization of Prisoners Course"**

## महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,

Mr. Sameer Shaikh (Guest Faculty, MIA) यांनी Fundamentalism, Terrorism आणि Violent Extremism यांचे स्वरूप आणि त्यांचा समाजावर होणारा परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

Mrs. Swati Sathe (Former Spl. IG Prisons) यांनी कारागृहातील कैद आणि त्याचे परिणाम तसेच कारागृह हे उच्च जोखमीचे वातावरण कसे ठरते यावर मार्गदर्शन केले.

Mr. Rahul Giramkar (PI, MIA) यांनी महाराष्ट्रातील दहशतवादी संघटनांची माहिती देऊन सुरक्षा दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे स्पष्ट केले.

Dr. Upneet Lalli यांनी कैद्यांचे Risk Assessment, Radicalization चे घटक आणि De-Radicalization साठीचे उपाय यावर मार्गदर्शन केले.

Mr. Yogesh Desai (Spl IG Prisons, Pune) यांनी कारागृहांमध्ये De-Radicalization कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि चांगल्या पद्धती (Good Practices) याबाबत मार्गदर्शन केले.

Mr. Rajesh Bhagwat (PI, MIA) यांनी कारागृहातील Intelligence Gathering आणि माहिती संकलनाचे महत्त्व स्पष्ट केले.

Ms. Kalpana (Social Worker, Prayas Project, TISS Mumbai) यांनी कैद्यांचे पुनर्वसन, समाजात पुनर्संलग्नता आणि Aftercare याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी माजी पोलीस महासंचालक श्री . दत्ता पडसळगीकर साहेब यांची मान्यवर उपस्थिती लाभली. तर समारोप प्रसंगी राज्य गुप्तवार्ता विभागाचे आयुक्त श्री शिरीष जैन साहेब ,संचालक श्री रामकुमार साहेब, तसेच महाराष्ट्र राज्य कारागृह विभागाचे माननीय अप्पर पोलीस महासंचालक सुहास वारके साहेब व विशेष महानिरीक्षक श्री योगेश देसाई साहेब उपस्थित होते.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**जागतिक महिला दिनानिमित्त अधिकारी/ कर्मचारी व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन**

# नागपूर मध्यवर्ती कारागृह

दि. 01.03.2026 ते दि .08.03.2026 या कालावधीमध्ये श्री वैभव सु.आगे कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर,यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमीत्त कारागृह महिला अधिकारी व कर्मचारी तसेच कारागृह पुरुष कर्मचारी यांचे महिला कुटूंबिय यांच्यासाठी, दि.01.03.2026 रोजी पाककला स्पर्धेचे, दि.05.03.2026 रोजी निबंध स्पर्धेचे, दि.07.03.2026 रोजी मेंहदी स्पर्धेचे व दि. 08.03.2026 रोजि मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धामध्ये स्पर्धकांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. महीला अधिकारी/कर्मचारी यांनी आपले कर्तव्य, आपले कुटूंबाची जबाबदारी सांभाळुन या स्पर्धामध्ये सहभाग घेतला. स्पर्धामुळे त्यांचे अशा मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल. अशा स्पर्धामुळे महीला अधिकारी/कर्मचारी यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. प्रत्येक गटातील विजेत्यांना पारीतोषीक देऊन त्यांचे मनोबल वाढवण्यात आले. सकारत्मकता,आत्मविश्वास आणि कलागुणांना वाव देण्याच्या उददेशाने अशा कार्यक्रमाचे आयोजन नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात येत असते. या स्पर्धा मध्ये कारागृहातील अधिकारी/कर्मचारी यांनी व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.









महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे संस्थेमार्फत बद्यांना फायबर थाळी, बाऊल व ग्लास देण्यात आले.**

# येरवडा मध्यवर्ती कारागृह

"सुधारणा व पुनर्वसन" हे कारागृह विभागाचे ब्रीद वाक्य असुन कारागृह प्रशासनाकडुन बंद्यांसाठी नाविण्यपूर्ण सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, प्रबोधनात्मक व मनोरंजनात्मक उपक्रम विविध सामाजिक सेवाभावी संस्थेमार्फत नियमिपणे राबविण्यात येतात. त्यानूसार आज दि.24.03.2026 रोजी "महिला माहेर प्रतिष्ठान, पुणे" या संस्थेने सामाजिक बांधलकी जपत येरवडा मध्यवर्ती कारागृह व येरवडा महिला कारागृहातील बंद्यांसाठी 1000 नग फायबर थाळी, 2000 नग बाऊल, 1000 नग ग्लास निशुल्क भेट दिले.



सदर कार्यक्रम मा. डॉ. सुहास वारके (भा. पो. से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच श्रीमती. विद्या म्हात्रे, अध्यक्ष, माहेर महिला प्रतिष्ठान, कुष्ठले, श्रीमती. सीमा सुनिल रामानंद, श्रीमती. सिंधुताई गोळे, सर्वमंगल ट्रस्टचे श्री. जयदीप भाई, श्री. मनसुख भाई पटेल व इतर पदाधिकारी यांचे उपस्थित पार पडला. महिला माहेर संस्था कारागृहात बंद्यांसाठी नियमिपणे स्तुत्य उपक्रम राबवत असतात. सदर कार्यक्रमावेळी मा. महोदयांनी महिला माहेर संस्थेच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करुन आभार व्यक्त केले.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे संस्थेमार्फत बद्यांना फायबर थाळी, बाऊल व ग्लास देण्यात आले.

# येरवडा मध्यवर्ती कारागृह

कार्यक्रमासाठी श्री. सुनिल एन ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे, श्री. शामकांत शेडगे, अधीक्षक, येरवडा जिल्हा खुले कारागृह, पुणे, श्रीमती. पी. पी. कदम, अति. अधीक्षक, डॉ. बी एन ढोले, उपअधीक्षक, श्री. आर ई गायकवाड, उपअधीक्षक, श्री. आनंदा एस कांदे, वरीष्ठ तुरुंगाधिकारी, महिला माहेर संस्थेचे श्रीमती. मीना नाईक, श्रीमती. अमृता शहा व कारागृह अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. डॉ. सुहास वारके (भा. पो. से) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच श्रीमती. विद्या म्हात्रे, अध्यक्ष, माहेर महिला प्रतिष्ठान, कुष्ठले, श्रीमती. सीमा सुनिल रामानंद, श्रीमती. सिंधुताई गोळे, सर्वमंगल ट्रस्टचे श्री. जयदीप भाई, श्री. मनसुख भाई पटेल व इतर पदाधिकारी यांचे उपस्थित पार पडला. महिला माहेर संस्था कारागृहात बंद्यांसाठी नियमिपणे स्तुत्य उपक्रम राबवत असतात. सदर कार्यक्रमावेळी मा. महोदयांनी महिला माहेर संस्थेच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करुन आभार व्यक्त केले.





महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे अधिकारी/ कर्मचारी विश्रांतीगृहाचे उद्घाटन व स्वयंपाकगृहाचे मोड्युलर किचन रूपांतर याचे उद्घाटन करण्यात आले.**

## ठाणे मध्यवर्ती कारागृह

दिनांक 25/03/2026 रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे लेखापरीक्षण अहवाल भाग-1 निमित्त मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई यांनी ठाणे कारागृहास भेट दिली होती. .मा. महोदयांच्या हस्ते डीपीडीसी मधून करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी विश्रांतीगृहाचे उद्घाटन ,बंदी ई-मुलाखत कक्षाचे उद्घाटन त्याच बरोबर कारागृहातील स्वयंपाकगृहाचे नूतनीकरण करून मोड्युलर किचनमध्ये रूपांतरित करण्यात आले आहे त्याचेही उद्घाटन करण्यात आले.







# नागपूर मध्यवर्ती कारागृह

## जागतिक महिला दिनानिमित्त महिला बंद्यासाठी विविध स्पर्धेचे आयोजन

जागतिक महिला दिनानिमीत्त वऱ्हाड सेवाभावी संस्था अमरावती यांच्यामार्फत संगीत खूर्ची, पेपर डान्स, अंताक्षरी अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धामध्ये महिला बंद्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. अशा स्पर्धामुळे त्यांचे मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल. अशा स्पर्धामुळे महीला बंद्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. सकारत्मकता,आत्मविश्वास आणि कलागुणांना वाव देण्याच्या उददेशाने अशा कार्यक्रमाचे आयोजन नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात येत असते.





## जागतिक महिला दिनानिमित्त महिला बंद्यासाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन

जागतिक महिला दिनानिमीत्त रिफ्रेश व्यसनमुक्ती नागपूर यांच्यामार्फत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धामध्ये महिला बंद्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. अशा स्पर्धामुळे महीला बंद्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो व मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होईल. सकारत्मकता, आत्मविश्वास आणि कलागुणांना वाव देण्याच्या उददेशाने अशा कार्यक्रमाचे आयोजन नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात येत असते.




**नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे जागतिक महिला दिनानिमीत्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन**

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

जागतिक महिला दिनानिमीत्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कारागृहातील कारागृह महिला अधिकारी व कर्मचारी तसेच कारागृह पुरुष कर्मचारी यांचे महिला कुटूंबातील सदस्यांनी एकल नृत्य, समुहनृत्य, कराओके गीत असे विविध कलागुण सादर केले. त्याचबरोबर सुंदर गाण्याचे सादरीकरण केले. सकारत्मकता,आत्मविश्वास आणि कलागुणांना वाव देण्याच्या उददेशाने अशा कार्यक्रमाचे आयोजन नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात येत असते.

सदरील सांस्कृतिक कार्यक्रम श्री वैभव सु.आगे कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर, श्रीमती दिपा आगे, अति. अधीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.







महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**मनोरुग्ण बंद्यासाठी योगा व ध्यान शिबीर**

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

श्री वैभव सु.आगे कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर,यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहातील मनोरुग्ण बंद्यासाठी योगा व ध्यान शिबीरला दि २०.०३.२०२६ रोजी सुरूवात झाली. योगप्रशिक्षक श्रीमती सीमा क्षीरसागर ,प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर सदरील शिबीर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आले आहे.

मानसिक आरोग्यासाठी योगा व ध्यान शिबीर मोठया प्रमाणावर नागपूर मध्यवर्ती कारागृहात राबवली जात असतात. बंद्यामधील नैराश्य दुर करणे आणि त्यांच्यामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे. अश्या शिबीरामध्ये बंद्याच्या वर्तनात बदल घडवून आणण्यासाठी आणि कारागृहात तणावमुक्त वातावरण राखण्यासाठी अंत्यत प्रभावी ठरत आहेत.





**श्री. श्री. रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट यांच्या कौशल्य प्रशिक्षण परीक्षेचे आयोजन**

श्री. श्री. रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट् यांच्या मार्फत बंद्यासाठी सोलार पॅनेल व इलेक्ट्रीक असिस्टंट याचे दि 23.09.2025 ते दि 11.12.2025 या कालावधीत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षणाची परीक्षा दि 20.03.2026 रोजी नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे पार पडली. सदरील परीक्षेसाठी सोलार पॅनेल प्रशिक्षणाचे 24 शिक्षाबंदी व इलेक्ट्रीक असिस्टंट प्रशिक्षणाचे 25 शिक्षाबंदी उपस्थित होते.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**आटपाडी खुली वसाहत येथे “Happy Thoughts” हा कार्यक्रम घेन्यात आला.**

# आटपाडी खुली वसाहत

आज दि.01.03.2026 रोजी स्वतंत्रपूर खुली वसाहत आटपाडी येथे तेजज्ञान फाऊंडेशन पुणे संस्थेमार्फत बंद्यामध्ये परिवर्तन घडविण्यासाठी, सकारात्मक विचार आचरणात आणण्यासाठी तसेच कारागृहातून सुटल्या नंतर पुन्हा गुन्हेगारी क्षेत्राकडे न वळता त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी Happy Thoughts उपक्रमाच्या माध्यमातून सरश्री यांचे संदेश व त्यांचे स्पूर्ती व प्रेरणादायक विचार चित्रफिती माध्यमातून सांगण्यात आले आणि प्रेरणादायी विचाराची पुस्तके वाटप करून प्रशंसीय उपक्रम राबविण्यात आला. यावेळी 9 बंदी व अधिकारी, कर्मचारी हे उपस्थित.












# भंडारा जिल्हा कारागृह

**भंडारा जिल्हा कारागृहात श्रीमद्भागवत गीता चे पठन झाले.**

कारागृहातील बंद्यांमध्ये सकारात्मकता वाढीस लागण्याच्या दृष्टीने, भंडारा जिल्हा कारागृह वर्ग-1 येथे दिनांक 16/01/2026 पासुन गीता परिवार या संस्थेमार्फत ऑनलाईन संस्था वर्ग सुरु करण्यात आले आहे. दि.06.03.2026 रोजी भंडारा जिल्हा कारागृह येथिल बंद्यांना, श्रीमद्भागवत मधील 12 व्या आणि 15 व्या अध्यायांच्या ऑनलाइन शुध्द पठणाची परिक्षामध्ये उत्तीर्ण बंद्यांना गीता परिवार या संस्थेमार्फत गीता गुज्जन प्रशस्तीपत्र देण्याकरीता कारागृहाचे अधिक्षक श्री. मंगेश जगताप यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाकरीता प्रमुख पाहुणे श्री. सुधीर जोशी, गीता परिवार प्रतिनिधी भंडारा, हे उपस्थित होते. कारागृहात सुरु असलेल्या ऑनलाइन गीता संस्था वर्गामध्ये, कारागृहातील 38 बंद्यांकडून श्रीमद्भागवत मधील संस्कृत अध्याय पठन करुन घेण्यात आले. त्यामध्ये 12 व्या आणि 15 व्या अध्यायांच्या ऑनलाइन शुध्द पठणाची परिक्षा घेण्यात आली. सदर परिक्षेमध्ये कारागृहातील 24 पुरुष बंदी उत्तीर्ण झाले आहेत. कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे श्री. सुधीर जोशी यांनी कारागृहातील बंद्यांना श्रीमद्भागवतमुळे, बंद्यांचे मनपरिवर्तन घडवुन आणण्यास मदत होण्याच्या दृष्टीकोनातून, श्रीमद्भागवत वर्गाचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर 24 उत्तीर्ण बंद्यांना गीता गुज्जन प्रशस्तीपत्र व श्रीमद्भागवत पुस्तकाची प्रत देण्यात येवून, त्यांचा आनंद द्विगुणीत करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री.डी.एस.आडे, तुरुंगाधिकारी श्रेणी-1 यांनी केले. सदर कार्यक्रमादरम्यान कारागृहातील अधिकारी/ कर्मचारी श्री. ब्रम्हा चोपकर, तु.अ.श्रेणी-2, श्री. विजय निस्ताने सुभेदार, श्री. गिरधारी बिसेन शिपाई व इतर कारागृह कर्मचारी उपस्थित होते.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**चंद्रपूर जिल्हा कारागृह दिव्यांग आणि कुष्ठमुक्त आनंदवनच्या ‘स्वरानंदवन’ संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले.**

# चंद्रपूर जिल्हा कारागृह

दिव्यांग आणि कुष्ठमुक्त कलाकारांच्या जिद्दीने फुललेल्या कलेतून प्रत्येकाला आयुष्यात नव्याने उभे राहण्याची प्रेरणा मिळते. माणसाकडून चूक होऊ शकते; मात्र त्या चुकीनंतरही आयुष्य संपत नाही. दिव्यांग बांधवांकडून प्रेरणा घेत कैदी बांधवांनीही सकारात्मक विचाराने पुढील आयुष्य घडवावे, कारण कारागृह ही शेवट नसून आयुष्याची नवी सुरुवात ठरू शकते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विनय गोडा यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त आनंदवन येथील ‘स्वरानंदवन’ ऑर्केस्ट्राच्या माध्यमातून कैदी बांधवांसाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.







हा कार्यक्रम डॉ. विकास आमटे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या आनंदवन येथील ‘स्वरानंदवन’ ऑर्केस्ट्राद्वारे सादर करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य न्याय दंडाधिकारी प्रशांत कुळकर्णी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी धनंजय साळवे, जिल्हा कारागृह अधीक्षक अनुपकुमार कुमरे, आनंदवनचे विश्वस्त सुधाकर कडू, स्वरानंदवनचे प्रमुख व्यवस्थापक सदाशिव ताजने, प्रशासकीय अधिकारी राजेश ताजने तसेच कारागृहातील अधिकारी व कैदी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

# चंद्रपूर जिल्हा कारागृह

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला पोलीस कर्मचारी, महिला कैदी तसेच स्वरानंदवन ऑर्केस्ट्रामधील अंध महिला कलाकारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर दिव्यांग कलाकारांनी हिंदी, मराठी व तेलगू भाषेतील एकापेक्षा एक बहारदार गीते व नृत्य सादर करून उपस्थित कैदी बांधवांचे मन जिंकले.या कार्यक्रमातून कैद्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून त्यांनी आपल्या भूतकाळातील गुन्हेगारी प्रवृत्ती विसरून पुढील आयुष्यात चांगले नागरिक बनण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रमातील पाहुण्यांचे आभार जिल्हा कारागृह अधीक्षक अनुपकुमार कुमरे यांनी मानले.

**चंद्रपूर जिल्हा कारागृह येथे जागतिक महिला दिनाचे आयोजन.**













महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**रत्नागिरी खुले कारागृह येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्याचे उदघाटन समारंभ.**

## रत्नागिरी खुले कारागृह

दिनांक १५.३.२०२६ रत्नागिरी विशेष/खुले कारागृह मा.राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, मा.महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई, मा.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा रत्नागिरी या महामेळाव्याचे उदघाटन समारंभ सन्मा.न्यायमूर्ती श्री.माधव जे जामदार, उच्च न्यायालय मुंबई तथा पालक न्यायमूर्ती जि . रत्नागिरी सन्मा.न्यायमूर्ती श्री.हितेन.एस.वेणेगावकर, उच्च न्यायालय मुंबई तथा पालक न्यायमूर्ती जि . रत्नागिरी तसेच मात.श्री.विनोद वाय.जाधव प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. महामेळव्यात सहभाग घेणेबाबत सन्मा.न्यायमूर्ती यांनी या कार्यालयास आदेशित केले होते. त्याअनुषंगाने रत्नागिरी विशेष/खुले कारागृहात बंदी बांधवांना देण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, सुधारणा पुनर्वसन बाबतची माहिती सदर महामेळाव्यात व्यक्तिशः उपस्थित राहून सन्मा . न्यायमूर्ती उच्च न्यायालय यांना आदरपूर्वक दिली आहे.सदरील कारागृह योजना सुविधा बाबत सन्मा.न्यायमूर्ती यांनी समाधान व्यक्त केले आहे.पुढील काही कालावधीमध्ये रत्नागिरी विशेष कारागृह येथे भेट देणार असलेबाबत न्यायमूर्ती यांनी सांगितले.

प्रसंगी प्रभारी कारागृह अधीक्षक श्री. संदीप . ई. चव्हाण तसेच कारागृहातील कर्मचारी, श्री . किशोरसिंग परदेशी, श्री . गणेश चोपडे उपस्थित होते.





महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय येथे जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**

# दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय

महाराष्ट्र कारागृह विभागाची प्रशिक्षण देणारी शिखर संस्था असलेली दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे येथे दि. १४/०३/२०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संस्थेतील महिला अधिकारी व कर्मचारी तसेच ७२ प्रशिक्षणार्थी महिला कारागृह शिपाई यांचे समवेत मोठ्या उत्साहात महिला दिनाचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे दिप प्रज्वलन संस्थेच्या प्रशासन अधिकारी श्रीमती. कल्पना झिंझुडे तसेच महिला तुरुंगाधिकारी श्रीमती. परवीन तडवी व महिला कारागृह शिपाई श्रीमती. रुपाली घाडगे यांचेकडून करण्यात आले.










महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय येथे जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.**

## दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय

संस्थेचे प्राचार्य श्री. नितीन वायचळ यांनी संस्थेच्या महिला अधिकारी व कर्मचारी तसेच सर्व प्रशिक्षणार्थी महिला कारागृह शिपाई यांना समाजातील विविध क्षेत्रातील कर्तृत्वान महिलांच्या योगदानाची माहिती देवून कारागृह विभागातील महिलांनी देखील असे योगदान देण्याचा मार्मिक संदेश दिला. प्राचार्य श्री. नितीन वायचळ यांनी उपस्थित सर्व महिलांना गुलाब पुष्प देवून सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षणार्थी महिला कारागृह शिपाई यांनी आपल्या कला गुणांचे प्रदर्शन करुन एका अर्थाने स्त्री सशक्तीकरणाचा संदेश देवून कार्यक्रम अधिकच द्विगुणीत केला. जाणीव सामाजिक संस्था, पुणे च्या अध्यक्षा श्रीमती. हेमा बिबवे व समन्वयक प्रमुख श्रीमती. स्वाती क्षीरसागर याही या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. जाणीव सामाजिक संस्था, पुणे या संस्थेमार्फत संस्थेच्या महिला तुरुंगाधिकारी श्रीमती. परवीन तडवी यांचा सत्कार करण्यात आला. जाणीव सामाजिक संस्था यांचे वतीने मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित करुन त्यांनी मराठी व हिंदी बहारदार गीते सादर करुन कार्यक्रमात विशेष रंगत आणली.सदर महिला दिनाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन या संस्थेच्या श्रीमती, परवीन तडवी, तुरुंगाधिकारी श्रेणी-२ यांच्या नियंत्रणाखाली मोठ्या दिमाखात संपन्न झाला.



महाराष्ट्र शासन

महासंचालक

कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

## ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे विशेष ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले

# ठाणे मध्यवर्ती कारागृह

दिनांक 26/03/2026 रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथे रामनवमी सनानिमित्त मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार , अध्यक्ष, श्री.सपेश निमा,रोटरी क्लब ऑफ मुंबई, मुलुंड साऊथ, मुलुंड यां संस्थेच्यावतीने कारागृहातील बंद्यासाठी डॉ. राहुल जोशी यांची म्युझिकल थेरपीवर आधारित विशेष ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हिंदी,मराठी,चित्रपट गीते भजन,कव्वाली,देशभक्तीपर गीते सादर करण्यात आली होती. यावेळी श्रीमती राणी.रा.भोसले, अधीक्षक, अति.अधीक्षक श्री.राजाराम रा.भोसले., उप अधीक्षक,श्री.डी टी डाबेराव.श्री.व्ही.पी कापडे.वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.कैलास भवर,श्री.नागेश पाटील ,अध्यक्ष, श्री.सपेश निमा,रोटरी क्लब ऑफ मुंबई, मुलुंड साऊथ, मुलुंड, राज कोसला,मीनाक्षी कोसला, संगीतवाद्यवृंद, किरण गायकवाड,पवन जोशी तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.









**कल्याण जिल्हा कारागृहात महिला बंदयांकरीता हॉटेल व्यवस्थापन व लहान मुलांना आवश्यक वस्तुचे वाटप करण्यात आले.**

# कल्याण जिल्हा कारागृह

कल्याण जिल्हा कारागृह व टाटा स्ट्राईव्ह वोल्टास सेंटर या अशासकिय संस्थेच्या संयुक्त विदयमानाने दिनांक-26.03.2026 ते दिनांक 28.03.2026 या तीन दिवसाच्या कालावधीत 42 महिला बंदयांकरीता हॉटेल व्यवस्थापन क्षेत्राशी (वाढपी/उपहारगृह व्यवस्थापक/विक्री प्रतिनिधी/स्वच्छता सेवक/बहुपाकृती आचारी इ.) निगडीत प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडुन, प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच महिला बंदयांच्या मुलांकरीता टुथ ब्रश, टुथ पेस्ट, बाथ सोफ, हातरुमाल, बाथ टॉवेल, इ. आवश्यक वस्तुचे वाटप करण्यात आले.














# नागपूर मध्यवर्ती कारागृह

**नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.**

सुधारणा पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रिद असुन कारागृहातील बंदयांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कारागृहात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. मा. श्री. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे महिला बंदयांसाठी पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेमार्फत "हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षणाचे" आयोजन करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणाकरीता कारागृहातील 80 महिला बंदयांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षणादरम्यान महिला बंदयांनी फेब्रिक पाऊच, टोट बॅग, क्ले ज्वेलरी, वारली पेंटींग व क्ले पेपर वेट इत्यादी सुबक व आकर्षक वस्तु तयार केल्या. महिला बंदयांनी तयार केलेल्या सदरच्या वस्तु कारागृहाचे विक्री केंद्रामध्ये विक्रीकरीता ठेवण्यात आल्या होत्या. सदर वस्तुंची मोठया प्रमाणात विक्री झालेली असुन कारागृहाचे उत्पन्नात भर पडली आहे.

बंदयांनी तयार केलेल्या वस्तु समाजातील लोकांपर्यंत पोहचाव्यात व बंदयांना देखील कारागृहात रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच कारागृहातुन बंदी मुक्त झाल्यानंतर स्वत:चे व कुटुंबाचे पालन-पोषण करण्यासाठी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी कारागृहात बंदयांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते.



महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

## नागपूर मध्यवर्ती कारागृह

**नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेल्या कारागृहातील महिला बंदयांना प्रमाणपत्र देण्यात आले.**

पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेमार्फत हस्तकला व लिपण आर्ट प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेल्या कारागृहातील महिला बंदयांना आज दिनांक 31.03.2026 रोजी प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाकरीता कारागृह अधीक्षक श्री. वैभव आगे, अतिरीक्त अधीक्षक, श्रीमती दिपा आगे, प्रमुख पाहुणे ॲड. गणेश खानझोडे, उच्च न्यायालय, नागपूर, ॲड. कौस्तुभ लुले, ॲड. गौरव खोंड, पिडीलाईट फेविक्रिल इंडीया, नागपूर या संस्थेच्या प्रशिक्षक श्रीमती प्राजक्ता जोगळेकर, यांचे हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाकरीता श्री. श्रीधर काळे, उपअधीक्षक, श्री. आनंद पानसरे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. वामन निमजे, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. नितीन क्षिरसागर, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्री. भिमराव राऊत, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, श्रीमती मिना लाटकर, प्रयास सामाजिक कार्यकर्ता, श्रीमती दुर्गा शहारे, हवालदार व इतर महिला कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती स्वाती भगत, शिक्षिका व आभार प्रदर्शन श्रीमती मिना लाटकर, प्रयास सामाजिक कार्यकर्ता, यांनी केले.



**अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे १० दिवसीय विपश्यना ध्यानधारणा शिबीराचे आयोजन**

## अमरावती मध्यवर्ती कारागृह

दिनांक ०५/०३/२०२६ रोजीपासून १६/०३/२०२६ पर्यंत धम्म अनाकुल विपश्यना साधना केंद्र, तेल्हारा जि. अकोला व समता फाऊंडेशन, मुंबई या संस्थेच्या सहकार्याने अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे १० दिवसीय विपश्यना ध्यानधारणा शिबीराचे आयोजन करण्यात आले असून सहभागी २१ साधक बंदयांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे.





महाराष्ट्र शासन
महासंचालक
कारागृहे व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांचे सहकार्याने Solar Panel Installation Technician Course करिता १७ बंदयांची परीक्षा घेण्यात आली.**

## अमरावती मध्यवर्ती कारागृह

दिनांक २०/०३/२०२६ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहामध्ये महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांचे सहकार्याने Solar Panel Installation Technician Course चे दुसऱ्या बॅचमधील १७ बंदयांची परीक्षा घेण्यात आली.



